आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२७ एप्रिल २०२४ -शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाला स्थिर सरकार देण्याची विरोधकांमध्ये क्षमता नसल्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची कोल्हापूरात टीका

- धर्म आणि जातीच्या नव्हे तर रोजगार, पाणी, रस्ते आणि शिक्षणाच्या मुद्द्यावर मतदान करण्याचं काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांचं लातूरमध्ये आवाहन

- ६ देशांमध्ये ९९ हजार मेट्रीक टनांहून अधिक कांदा निर्यातीला केंद्र सरकारची परवानगी, कांद्याच्या विकिरण क्षमतेतही तिप्पट वाढ

**आणि**

- तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत ज्योती वेण्णमची सुवर्णपदकाची हॅटट्रिक, जलतरणात श्रीहरी नटराजनला सुवर्णपदक

**<><><><><>**

देशाला स्थिर सरकार देण्याची विरोधकांची क्षमता नसल्याचा दावा प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी कोल्हापुरातल्या प्रचार सभेत केला. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यासह विरोधकांवर सडकून टीका केली. महाराष्ट्राला सामाजिक न्यायाची परंपरा आहे पण काँग्रेसने सामाजिक न्यायाची हत्या केल्याचा आरोप त्यांनी केला. यासाठी त्यांनी कर्नाटकाचं उदाहरण दिलं.

आगामी टप्प्यांमध्ये महायुतीच्या उमेदवारांना निवडून देण्याचं आवाहन त्यांनी केलं. यावेळी त्यांनी कोल्हापूर आणि पश्चिम महाराष्ट्रात केलेल्या विकास कामांचे दाखले दिले.

**होल्ड प्रधानमंत्री बाइट**

राज्यात ‘हर घर मोदी, मन मन मोदी’ आहेत. त्यामुळे महायुतीच्या उमेदवारांना निवडून मोदींच्या ४०० पारच्या स्वप्नाला हातभार लावा, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं.

‘मान देऊया गादीला, मत देऊया नरेंद्र मोदींना’ हे कोल्हापूरकरांनी ठरवलं आहे. कोल्हापूरचा हुंकार दिल्लीत पोहचवा, असं आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

धर्म आणि जातीच्या आधारावर नव्हे तर रोजगार, पाणी, रस्ते आणि शिक्षणाच्या मुद्द्यावर मतदान करा असं आवाहन काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी आज केलं. लातूरमध्ये प्रचारसभेत त्या बोलत होत्या. जाहिरातींना भुलून न जाता वास्तवाकडे लक्ष द्या आणि येत्या ५ वर्षात आयुष्यात सुधारणा करायची असेल तर विचारपूर्वक मतदान करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**होल्ड - प्रियंका गांधी**

भाजपाच्या सरकारनं देशातल्या जनतेच्या समस्या सोडवल्या नाहीत. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यात सरकारला अपयश आल्याची टीका त्यांनी केली. विद्यमान सरकारच्या काळात महागाई वाढली. महिलांवर

होणाऱ्या अत्याचारांच्या मुद्द्यावर प्रधानमंत्री काहीही बोलत नाही. राज्यातलं सरकार त्यांनी पैशाच्या बळावर पाडलं, असा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

काँग्रेस पक्ष सत्तेत आला तर महिलांच्या खात्यात एक लाख रुपये टाकले जातील आणि केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमध्ये ५० टक्के राखीव जागा ठेवल्या जातील असं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज सांगितलं. ते आज आसाममध्ये बारपेटा जिल्ह्यात एका प्रचारसभेत बोलत होते. काँग्रेस पक्ष ३० लाख नोकऱ्यांच्या शिवाय शिकाऊ उमेदवारी कार्यक्रमातून रोजगार निर्माण करेल आणि तरुणांना १ लाख रुपये विद्यावेतन देईल असंही त्यांनी सांगीतलं.

**<><><><><>**

शेतकऱ्यांच्या विरोधातले निर्णय घेण्याचं धोरण नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वातल्या सरकारनं अवलंबल्याची टीका शरद पवार यांनी केली. ते आज महाविकास आघाडीचे माढा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रचारार्थ सांगोला इथं आयोजित जाहीर सभेत बोलत होते. साखर निर्यात बंदी, इथेनॉल निर्मितीवर बंदी, दुधाच्या किंमती कमी करण्याचे प्रयत्न अशी उदाहरणं त्यांनी यावेळी दिली. मनमोहन सिंग यांच्या तुलनेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी फार वेळ संसदेत येत नसल्याचा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

भारतीय जनता पक्षानं उत्तर मध्य मुंबईतून ज्येष्ठ वकील उज्वल निकम यांना उमेदवारी दिली आहे. या मतदारसंघात भाजपाच्या पूनम महाजन विद्यमान

खासदार आहेत. निकम यांचा सामना आता काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांच्याशी होणार आहे.

**<><><><><>**

वायएसआर काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री वाय एस जगन मोहन रेड्डी यांनी आज लोकसभा निवडणुकीसाठी पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. पक्षानं मागील लोकसभा निवडणूक जाहीरनाम्यातली ९९ टक्के आश्वासनं पूर्ण केल्याचा दावा रेड्डी यांनी केला. सत्तेत आल्यास सर्व कल्याणकारी योजना सुरूच ठेवण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. महिलांना सध्या मिळत असलेल्या वार्षिक ७५ हजार रुपयांची मदत वाढवून दीड लाख रुपये करण्यात येईल, ज्येष्ठ नागरिकांना मिळणाऱ्या भत्त्यातही दोन टप्प्यांत ५०० रुपयांपर्यंत वाढ करत ती साडे तीन हजार रुपयांपर्यंत नेली जाईल, अशी आश्वासनं जाहीरनाम्यात दिली आहेत.

कांद्यावरची निर्यातबंदी केंद्र सरकारने काही प्रमाणात शिथिल केली आहे. बांगलादेश, संयुक्त अरब अमिरात, भूतान, बहारीन, मॉरिशस आणि श्रीलंका या सहा देशांमधे ९९ हजार १५० मेट्रिक टन कांद्याची निर्यात करायची परवानगी सरकारनं दिली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत २०२३-२४ या वर्षात खरीप आणि रब्बी पिकांचं उत्पादन कमी असल्याच्या अंदाजाच्या तसंच आंतरराष्ट्रीय बाजारात मागणी वाढल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतल्याची माहिती शासनानं जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात दिली आहे. दरम्यान, साठवणुकीदरम्यान कांद्याची नासाडी कमी करण्यासाठी ग्राहक व्यवहार विभागाने भाभा अणुसंशोधन केंद्राच्या तांत्रिक पाठबळाने विकिरण प्रक्रिया आणि शीत साठवणूक प्रक्रिया केलेल्या

साठ्यात गेल्या वर्षीच्या बाराशे मेट्रिक टनावरून यावर्षी पाच हजार मेट्रिक टन इतकी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या वर्षी कांदा विकिरण आणि शीत साठवणूक प्रक्रियेचा अवलंब केल्यावर कांद्यांची नासाडी १० टक्क्यांपेक्षा कमी झाल्याचे आढळले होते.

केंद्र सरकारने सरसकट कांदा निर्यात बंदी गरजेचे होते. यापासून शेतकऱ्यांना कोणताही फायदा होणार नाही, असा दावा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संदीप जगताप यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना केला.

**<><><><><>**

शांघाय इथं सुरु असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारताच्या ज्योती सुरेखा वेण्णम हिने आज सुवर्णपदकाची हॅटट्रिक केली. अंतिम सामन्यात तिने अव्वल मानांकित अँड्रिया बेकेरा हिला पराभूत करुन सुवर्णपदक पटकावलं. त्याआधी ती, आदिती स्वामी आणि परनीत कौर यांच्या कंपाऊंड संघाने इटलीला २३६-२२५ असं हरवून कंपाऊंड प्रकारातलं सुवर्णपदक जिंकलं. तर मिक्स्ड डबल्स प्रकारातही ज्योतीने अभिषेक वर्मासह भागीदारी करत इस्टोनियन खेळाडूंना १५८-१५७ असं हरवलं आणि मिक्स्ड डबल्स प्रकारातलं सुवर्णपदकही जिंकलं.

अभिषेक वर्मा, प्रियांशु आणि प्रथमेश फुगे यांनी कंपाउंड प्रकारात पुरुष गटात अंतिम फेरीमध्ये नेदरलँड्सला २३८-२३१ असं हरवून सुवर्णपदक जिंकलं.

**<><><><><>**

भारताच्या श्रीहरी नटराज यानं मलेशियात निमंत्रित गटातल्या जलतरण स्पर्धेत १०० मीटर बॅकस्ट्रोक प्रकारात सुवर्ण पदक जिंकलं. ५४ पूर्णांक ७१ सेकंदात त्यानं ही कामगिरी केली.

**<><><><><>**

येत्या पाच दिवसात देशाच्या पूर्व आणि द्विपकल्पिय भागात अतिउष्णतेची लाट पसरण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. पश्चिम बंगाल मध्ये गंगेच्या खोऱ्यात, ओदिशाच्या काही भागात आणि पश्चिम बंगालच्या हिमालयीन भागात अतिउष्णतेची लाट पसरण्याची शक्यता असून बिहार, झारखंड, तामिळनाडू, केरळ आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टी भागात उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. पूर्व भारत, महाराष्ट्र आणि भारताच्या द्विपकल्पिय भागात तापमानात २ ते ३ अंशांनी वाढ होईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

दरम्यान, येत्या चार दिवसात भारताच्या ईशान्य भागात जोरदार तर जम्मू, काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसासह हिमवर्षाव होण्याची शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे.

**<><><><><>**

बांगलादेशात गेल्या काही दिवसांमध्ये उष्माघाताने बारा जणांचा मृत्यू झाला आहे. देशाच्या विविध भागात झालेल्या या मृत्यूंना अतीतीव्र उष्मा कारणीभूत असल्याची शंका व्यक्त केली जात आहे. बांगलादेशातली तापमानाची ही स्थिती कायम राहील

आणि काही भागात आणखी तीव्र होईल असा अंदाज बांगलादेश हवामान विभागानं वर्तवला आहे.

**<><><><><>**

नवी मुंबई महानगर पालिकेनं ५३५ इमारती धोकादायक घोषित केल्या. नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्रातल्या धोकादायक इमारतींच्या सर्वेक्षणानंतर हा निर्णय देण्यात आला. महानगरपालिकेनं 30 वर्षांपेक्षा जास्त काळ झालेल्या इमारतीचं संरचनात्मक परीक्षण करून त्याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्याना दिले.

//<><><><><>//